# 'पाऊस पाणी' : ओल्याचिंब अनुभवाचा थेट आविष्कार

**प्रा.रेखा व्ही.इंगोले**
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला,विज्ञान व कै.पां.ठा.वाणिज्य महाविद्यालय,
मानोरा जि.वाशिम

**प्रस्तावना :-**

कवि विठ्ठल वाघ हे एक नामांकीत वैदर्भिय कवि आहेत. विठ्ठल वाघांची कविता ही कृषकांचे, ग्रामीण जीवनाचे पारंपारिक मूल्यांचे आणि लोक संस्कृतीचे दर्शन घडविणारी कविता आहे. त्यांना लोकगीतांचा लळा आहे. लोकतत्वीय धारणांचा अविष्कार करणे हे त्यांच्या कवितेचे एक बलस्थान आहे. लोक जीवनातील सांकेतिकता आणि परंपरागत जीवनमूल्ये त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहेत. हे सारे त्यांनी गेयता प्रासादिकता आणि औचित्यपूर्ण शब्दयोजनेतून केले आहे. त्यामुळे लोक मानसातील भाव भावना अचुकपणे टिपण्याचा त्यांचा प्रयत्न स्त्युत्य आहे. वाघांचे व्यक्तीत्व म्हणजे "चिखल-माती" आणि "पाऊस पाणी" हा त्यांच्या आत्माच्या मुळांशी असलेला उर्जा स्त्रोत आहे. वाघांच्या कोणत्याही कविता संग्रहाला पाऊस पाणी असे नाव शोभले असते. इतका पाऊस त्यांच्या भावानुभवाच्या केंद्रस्थानी आहे. रानशिवार, शेतवावर किंवा गाव खेडाच्या पार्श्वभूमिवरील त्यांच्या कोणत्याही कवितेत मातीचा गंध आणि पावसाचा आवेग दिसतो. वयात आलेल्या तरण्या पऱ्हाटीची मस्ती असो की, दुष्काळामुळे मोडून पडलेल्या कास्तकारांची काळीज कुरतडणारी काळजी असो या सगळ्यांचे प्राणतत्व पाऊसपाणी हेच दिसते.या अर्थाने वाघांच्या कवितेचा मूळस्त्रोत पाऊस आहे.

"पाऊस पाणी" हा एक ओलाचिंब अनुभवाचा थेट अविष्कार चौऱ्याऐंशी पृष्ठाच्या या दीर्घकाव्यात एकवीस कविता आहेत. प्रत्येक कवितेत दोन ओळींच्या चरणाची सुरवात बहुधा "पाऊस" या शब्दाने होते. पाऊस हा निसर्गाच्याही केंद्रस्थानी असल्याने निसर्गातील वेलीफुलांचे व झाडाझुडपांचे फुलणे, बहरणे, गंधावून जाणे याचे अत्यंत काव्यात्मक वर्णन पहिल्या काही कवितांमध्ये दिसते.

"पाऊस कोवळा मनचा हळवा
लाजत्या जुईला स्वभाव कळवा
          पावसात येई जुईला बहर
          सवती मत्सर जाईचा कहर
पावसाने उगी करू नये घाई
फुलायची आहे अंगणात जाई
          पाऊस जाईचे भिजवतो केस

सखे ग लाजतो जुईचा सुवास
पाऊस राजाचा त्यातून राणीचा
वेणीत गजरा माळतो जुईचा"

येथे पाऊस केवळ निमित्त आहे. पावसाच्या आगमनाने मानवी मन कसे मोहरून गेले आहे, हेच त्यांना मांडायचे आहे. केवळ भावनांचे नव्हे तर, सर्व दैहिक, लैंगिक आणि वासनासक्त विभ्रमाचे आरोपन कवीने येथे निसर्गावर केले आहे.

आयुष्यातील शृंगाराचा रंग संगीताच्या सुरात पावसाच्या तालावर कवी कसा शब्दातून उधळत जातो, हे पाहण्यासारखे आहे.

"पाऊस सनई पाऊस चौघडा
साथ करी त्यास किणकिण चुडा
पाऊस करतो रातचा कहर
दम घ्यायचा ना हातचा बिल्लोर
पाऊस सतार सर असे तार
रानात संगीत घेत अवतार
पाऊस छेडती तळ्यात तरंग
पोरींच्या देहाची सतार अनंग"

पाऊस प्रणयातील हळुवारपणा जपणारा असतोच असे नाही. तो पुष्कळदा धसमुसळा, बेपर्वा, रांगडा, तर कधी बाजिंदा असतो. पावसाच्या या रांगडेपणामुळे रानावनातील आणि शेतावावरातील तरण्याबाठ्या पोरी कशा हैराण झाल्या आहेत. यावर वाघांची शब्दकळा अतिशय सैल सुटली आहे.

१. "पाऊस पोरींचा कसा ग मैतर?
ठेवी ना पदर अंगाखांद्यावर"

२. "पाऊस करतो मोत्यांची शिंपण
सावळ्या पोरीला रूपेरी गोंदण"

३. "पाऊस झाडांना गुंडाळतो वेत
कुंवार पोरींच्या ऊरी घालमेल"

पावसाचे असे बेभान प्रियकराचे रूप व्यक्त करताना वाघांची शब्दकळा बहरून न येती तर नवल !

पावसाचे आणि शेतकऱ्याचे नाते असे जीवनातील धुंदफुंद क्षणांशी असले तरी, त्यांचे जगणे-मरणे शेतातील पिकांसोबत जोडले असते. या शेताशी पावसाचा संदर्भ जसा जगण्याचा आहे, तसा कधी कधी मरणाचा देखील आहे. चवथ्या कवितेतील या प्रारंभीच्या ओळी पाहा -

"पाऊस कणीस पाऊसच ज्वारी
पाऊस तारता कोण पोटा मारी?
पावसाला वेड ज्वारीच्या पिकाचं
हातावर मळा कणीस चिकाचं
सरीत नसता पावसाचा जोर
वाण्याच्या जीवाला कणसात घोर
पाऊस कुणबी असतो शहाणा
थेंबाचा करतो कणसात दाणा
पावसाचा पाय तळ्यात मळ्यात
कणसाचा जीव अडतो खळ्यात"

पावसाचा पाय जेव्हा तळ्यात-मळ्यात असतो, तेव्हा काय घडते ते याच कवितेच्या अखेरच्या ओळीत कवी लिहितो-

"काढून घेतला पावसाने हात
पोटुशा ज्वारीचा घडे गर्भपात
ज्वारीस दाविली पावसाने पाठ
पीठ विसरले कोपराचा काठ
पावसाने लाड सोडला ज्वारीचा
तव्याने करावा कसा भाकरीचा?
ज्वारीस मुकली पावसाची माया
ऊनोन्या नशिबी गंजात जांभया"

अशा प्रकारे पाऊसच कसा शेतकऱ्याचा दसरा/दिवाळी आहे ते कवी सोळाव्या कवितेत सांगतो.

पाऊस घालतो दारात रांगोळी
तेव्हाच नांदते घरात दिवाळी
पाऊस दसरा पाऊस दिवाळी
पाऊस नसता संसाराची होळी
पाऊस पाण्याला पुरणाची चव
होळी दिवाळी म्हणून उत्सव
पाऊस मातीत फुलतो फळतो
दिवाळीचा दिवा होऊन जळतो

विठ्ठल वाघांना पाऊस पाणी मधून अख्ये कृषीजीवन रंगवायचे आहे. वर्षभरातील सर्व सण उत्सवांचा संबंध पावसाशी आहे. पावसाचे संदर्भ शेतकऱ्यांच्या भावजीवनाशी व सुख-दु:खाशी जसा जुळलेला आहे तसे कवितेत उतरले आहे. लोकजीवन, लोकश्रध्दा, लोकभावना आणि निसर्ग हाच वाघांच्या काव्याचा खरा स्थायीभव असल्याने या कवितेत वऱ्हाडच्या लोकजीवनाचे ऋतुचक्र त्यांनी साकारले आहे. एखादा मोठा विषय अशा कवितेतून मोजक्या शब्दांत भावानुवर्ती पध्दतीने अविष्कृत होऊ शकतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

चिखल माती आणि पाऊस हे जसे कृषी संस्कृतीचे केंद्र, तसे गाय-बैल ही जनावरं आधारस्तंभ होत. म्हणून, सातव्या कवितेत पावसाच्या संदर्भात जनावरांचे शेतीभातीशी असलेले संबंध फार हळुवार आणि नेमक्या शब्दात कवीने उलगडून दाखविले आहे. रंग, गंध, स्पर्ध अशा सर्व संवेदना जागृत करण्याचे कसब वाघांच्या कवितेत आहे. पाऊस पडतांना घर, गाव, शेत, रान कसे बदलून जाते, हिरवेगार होतात. याचे बारीक सारीक तपशील वाघांच पाऊस पाणी मध्ये जिवंत होतात. मातीचे आणि पावसाचे नाते कसे सृजनांचे आदिबंधाच्या किंवा लोकतत्वाच्या प्रतिमामधून सांगतो, म्हणून ते अधिक प्रासादिक वाटते.

पाऊस झेलत माती ऋतुमती
कुशीतून ऋतू फलायचे किती?
पाऊस पुरवी मातीचा डोहाळा
सुगीत बघाचा सृजन सोहळा

पाऊस जसा सृजनाचा उत्सव आहे तसा तो कधी कधी विनाशाचा काळही कसा आहे, याचेही दर्शन या कवितेत घडते. पावसाच्या झडीत गरीबांच्या घरी कसे उपासतापास घडतात, तेही कवी सांगतो. पाऊस मेणाहून मऊ मनासारखा जसा असतो तसाच तो दगडधोंड्यासारखा आहे.

अवघ्या सृष्टीचे पावसात मूळ
मांडतो, मोडतो जीवनाचा खेळ
पावसाचा सैल सुटता कासरा
आसरांना लाभे डोहात आसरा
पांढरे होतसे पाऊस पाऊल
दाही दिशातून मरण चाहूल
पाऊस रूसला आडच आटला
घागरीला दोर फासच वाटला
पावसावाचून विहीर रडते
मनात अबोल घागर कुढते